# प्रबोधन
## गोरेगाव

## ३० वा वार्षिक अहवाल
## २००१-२००२



# प्रबोधन गोरेगाव

प्रबोधन क्रीडाभवन, प्रबोधन क्रीडाभवन मार्ग, सिद्धार्थ नगर, गोरेगाव (प.), मुंबई 400 104.
दूरध्वनी : 873 48 69, 872 62 78

संस्था नोंदणी कायदा 1860 अन्वये नोंदवलेली संस्था (Regn. No. Mum. 46/72 GB BSD)
मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम 1950 अन्वये नोंदवलेली संस्था (Regn. No. F 2502 Mum.)



## पदाधिकारी व कार्यकारी मंडळ

2001-2002

| | | |
|---|---|---|
| अध्यक्ष | : | डॉ. मनोहर अद्वानकर, एम.एस.सी., पीएच.डी. |
| उपाध्यक्ष | : | ॲड्. विकास रेळे, बी. ए., एलएल्.बी. |
| | | श्री. सुरेश चव्हाण, बी. ए. |

## कार्यकारी मंडळ

| | | |
|---|---|---|
| कार्याध्यक्ष | : | श्री. पांडुरंग पोखरकर, बी. एस्सी., पीएच्.डी. |
| प्रमुख कार्यवाह | : | श्री. श्रीनिवास शिरसेकर, जी. डी. आर्ट. |
| सहकार्यवाह | : | श्री. मिलिंद डुंबरे, बी.कॉम. |
| | | श्री. समीर त्रैलोक्य, बी.कॉम |
| खजिनदार | : | श्री. नितीन शिंदे, बी.ए., डी. जे. |

## सभासद

| | |
|---|---|
| श्री. चंद्रकांत देऊलकर | श्री. विनोद निंबाळकर |
| श्री. भूषण काळे | श्री. सुधीर मिठबावकर, बी.एससी., बी.एड. |
| श्री. सुनील कवीश्वर | श्री. जेकब जॉन्सन |
| श्री. शशांक कामत, बी. कॉम. | श्री. चाको मॅथ्यू |
| श्री. चंद्रकांत पोतदार | श्री. अनिल देसाई |

## स्वीकृत सभासद

श्री. सचिन सावंत, बी.कॉम.

## अंतर्गत हिशेबतपासनीस

श्री. अनिल पाटील, सनदी लेखापाल

## सनदी लेखापाल

श्री. जयंत आपटे, बी.कॉम., एफ.सी.ए.

# प्रबोधन गोरेगाव

प्रबोधन क्रीडाभवन, प्रबोधन क्रीडाभवन मार्ग,
सिद्धार्थ नगर, गोरेगाव (प), मुंबई 400 104.
दूरध्वनी : 873 48 69, 872 6278

## 30 वी वार्षिक सर्वसाधारण सभा

प्रबोधन गोरेगाव या संस्थेची 30 वी वार्षिक सर्वसाधारण सभा शनिवार दि. 29 जून 2002 रोजी रात्रौ. 8.30 वाजता प्रबोधन क्रीडाभवन, प्रबोधन क्रीडाभवन मार्ग, सिद्धार्थ नगर, गोरेगाव (प), मुंबई 400 104 येथे आयोजित करण्यात आली आहे. या सभेस सर्व सभासदांनी वेळेवर उपस्थित राहावे ही विनंती.

**सभेपुढील कामकाज :**

1. प्रास्ताविक
2. मागील वार्षिक सभेचे इतिवृत्त वाचन व त्यास मंजुरी देणे.
3. 2001-2002 चा वार्षिक अहवाल, आयव्यय पत्रक व ताळेबंद हिशेबतपासनीसांच्या अहवालासह वाचून मंजूर करणे.
4. नवीन वर्षाकरिता 2002-2003 घटनेच्या कलम 7 इ प्रमाणे अध्यक्ष (1जागा) उपाध्यक्ष (2 जागा) व कार्यकारी मंडळावरील निवृत्त झालेल्या 3 सभासदांच्या जागी नवीन सभासदांची निवड करणे (एकूण 6 जागा)
5. नवीन वर्षाकरिता अंतर्गत हिशेबतपासनीस व सरकारमान्य हिशेबतपासनीस यांची नेमणूक करणे.
6. अध्यक्षांच्या अनुमतीने सभेपुढे येणारी कामे.

कार्यकारी मंडळाच्या आज्ञेवरून,
**पांडुरंग पोखरकर**
कार्याध्यक्ष

दि. 14 जून 2002
गोरेगाव, मुंबई.

**श्रीनिवास शिरसेकर**
प्रमुख कार्यवाह

---

1. संस्थेचा जमाखर्च प्रबोधन क्रीडाभवन, प्रबोधन क्रीडाभवन मार्ग, सिद्धार्थ नगर, गोरेगाव (प), मुंबई 400 104 येथील संस्थेच्या कार्यालयात दि.20 ते 22 जून 2002 पर्यंत संध्याकाळी 6 ते 7 या वेळेत अवलोकनार्थ ठेवण्यात येईल. कोणाही सभासदास त्याबाबतीत काही सूचना करावयाच्या असल्यास त्या दिनांक 24 जून 2002 पूर्वी कार्याध्याक्षंकडे लेखी सादर कराव्यात.
2. गणसंख्येच्याअभावी वरील सभा तहकूब झाल्यास, तहकूब झालेली सभा त्याच ठिकाणी अर्ध्या तासानंतर घेण्यात येईल व अशा सभेस गणसंख्येची आवश्यकता राहाणार नाही.
3. निवडणुकीस उभे राहू इच्छिणाऱ्या सभासदांनी आपले अर्ज दि. 25 जून 2002 पूर्वी संस्था कार्यालयात संध्याकाळी 6 ते 7 या वेळेत आणून द्यावेत. अर्जाचा नमुना सोबत दिला आहे.

**कार्यकारिणीवरील सदस्य निवडणुकीची सूचना**

1. निवडणुकीसाठी उभा रहाणारा उमेदवार, सूचक व अनुमोदक घटनेनुसार पात्र असला पाहिजे
2. खालील विहीत अर्जाच्या नमुन्यानुसार लेखी अर्ज सर्वसाधारण सभेच्या पूर्वी किमान पाच दिवस अगोदर कार्यालयात पोहोचला पाहिजे.
3. निवडून द्यावयाच्या जागांइतके किंवा कमी उमेदवार असतील तर त्यांची बिनविरोध निवड झाल्याचे जाहीर करण्यात येईल व उरलेल्या जागांसाठी सभेस उपस्थित असलेल्या सभासदांकडून सूचना मागविल्या जातील व आवश्यक ठरल्यास त्यांच्यातून उर्वरित जागांसाठी निवड करण्यात येईल.
4. निवृत्त होणारे सभासद निवडणुकीस उभे राहू शकतील.
5. उमेदवारास आपले नाव मागे घेण्याची अंतिम मुदत दि. 27 जून 2002 पर्यंत कार्यालयीन वेळेत राहील.
6. उमेदवाराने निवडणुकीच्या वेळी सभेस उपस्थित राहणे अपेक्षित आहे.

---

## उमेदवारी अर्जाचा नमुना

(अर्ज स्वतंत्र कागदावर लिहावा )

प्रमुख कार्यवाह
**प्रबोधन गोरेगाव**

प्रबोधन गोरेगावच्या 2002-2003 च्या अध्यक्षपदासाठी / उपाध्यक्षपदासाठी / कार्यकारिणी सदस्यत्वासाठी मी श्री. / सौ. / कु. ________________ यांचे नाव सुचवीत आहे.

सूचक सभासदाचे नाव श्री. / सौ. / कु. ________________ स्वाक्षरी :
सभासद क्रमांक :

वरील सूचनेस माझे अनुमोदन आहे. ________________

अनुमोदक सभासदाचे नाव श्री. / सौ. / कु. ________________ स्वाक्षरी :
सभासद क्रमांक :

वरील सूचनेस माझी संमती आहे.

उमेदवार सभासदाचे नाव ________________ स्वाक्षरी :

पत्ता : ________________
________________

सभासद क्रमांक :

श्रोत्यांची उपस्थिती लक्षणीय होती. व्याख्यानानंतर झालेल्या प्रश्नोत्तराने ॲड्. श्री. अरविंद वझे यांनी श्रोत्यांवर चांगलीच छाप टाकली व श्रोत्यांच्या सर्वच प्रश्नांची समाधानकारक उत्तरे दिली. त्या उत्तरातून त्यांचा वास्तुशास्त्र या विषयाचा व्यासंग लक्षात येत होता.

(12 मे 2001)

**श्री. रवींद्र पिंगे**

**पु.ल. देशपांडे** म्हणजे महाराष्ट्रास पडलेले एक स्वप्नच व महाराष्ट्राचे लाडके व्यक्तिमत्त्व. त्यांनी महाराष्ट्रातील सर्व जनतेस मनमुराद हसविताना अंतर्मुखही बनविले. माणसांच्या व्यक्तिमत्त्वातील बारकावे व कंगोरे आपल्या सिद्धहस्त लेखणीने साहित्यात उतरवून त्यांनी अनेक व्यक्तिरेखा जिवंत केल्या. असे पु.ल.देशपांडे आपल्यात नाहीत ही मनाला न पटणारी गोष्ट. पु. लं. नी आपल्या परीसस्पर्शाने अनेकांचे जीवन उजळून टाकले. श्री. रवींद्र पिंगे हे मराठीतील एक मान्यवर साहित्यिक. पु.लं. विषयीचे अनेक रसरशीत अनुभव त्यांच्याच तोंडून ऐकणे ही एक मोठी पर्वणीच. **'मी जवळून पाहिलेले पु.ल. देशपांडे'**या विषयावर व्याख्यान देताना **श्री. रवींद्र पिंगे** रंगून गेले होते व आजवर पु.लं.च्या विषयी कधीही न ऐकलेल्या व वाचलेल्या गोष्टी ऐकताना सर्वच रसिक मोहून गेले होते. 12 जून 2000 हा पु.ल. देशपांडे यांचा निर्वाण दिन, त्या वर्षगाठीचे औचित्य साधून हा कार्यक्रम आयोजित केल्याने त्यांच्या रसिक श्रोत्यांना अप्रूप वाटल्यावाचून राहिले नाही.

(16 जून 2001)

**श्री. सच्चिदानंद शेवडे**

गणेश किंवा गणपती हे दैवत सर्व हिंदुधर्मीयांसाठी आराध्यदैवत आहे. भाद्रपद महिन्यात येणारा गणेशोत्सव म्हणजे महाराष्ट्राचा सर्वात मोठा उत्सव. त्या गणेशाचा महिमा **श्री.सच्चिदानंद शेवडे** यांच्यासारख्या ख्यातनाम प्रवचनकारांकडून ऐकणे हा दुग्धशर्करा योगच. **'प्रबोधन व्यासपीठ'** तर्फे हा योग शनिवार दि. 21 जुलै 2001 रोजी जुळून आला. **'गणेशमहिमा'** या विषयावर आपले विचार मांडताना प्रवचनकार श्री. सच्चिदानंद शेवडे यांनी श्रोत्यांना कथा, पुराणे, वेद व इतर हिंदूंचे धार्मिक ग्रंथ यांचे संदर्भ देऊन गणेशमहिमा कथन करताना आपल्या भक्तिरसाळ वाणीने भारून टाकले.

(21 जुलै 2001)

**श्री. दा.कृ. सोमण**

आपल्या भारतीयांच्या जीवनात ज्योतिषाचे फारच महत्त्व आहे. प्रत्येक गोष्ट, शुभकार्य हे ज्योतिषशास्त्रानुसार पंचांग पाहून शुभमुहूर्त काढूनच केले जाते. एवढेच कशाला, आजच्या विज्ञानयुगात सुद्धा लग्न जमविताना पत्रिका पाहिली जाते. प्रत्येकास ज्योतिष्याविषयी ओढ व उत्सुकता असतेच. आजच्या जमान्यातील सर्वात लोकप्रिय ज्योतिषी व खगोलशास्त्राचे जाणकार

व सैतानालाही लाजवील असे पाशवी कृत्य केले. त्या दहशतवादाचा विळखा हिंदुस्थानभोवती आज अनेक वर्षे पडलेला आपण पाहतो आहोत. त्या दहशतवादाने आजवर अनेक बळी तर घेतलेच, पण आपले सैनिकी बळ फारच खर्ची घातले आहे. अशा दहशतवादावर आपले परखड विचार सैनिकी पेशातील **कर्नल दामोदर कुलकर्णी** यांनी **'आतंकवाद आणि भारत'** या कार्यक्रमांतर्गत शनिवार दि. 25 नोव्हेंबर 2001 रोजी व्यक्त केले. त्यांच्या परखड विचाराने श्रोतृवर्ग भारावून गेला. त्याच पेशातील असल्याने, कर्नल दामोदर कुलकर्णी यांच्या विचारांना प्रत्यक्ष कृती आणि उक्तीचे वजन प्राप्त झाले होते.

(25 नोव्हेंबर 2001)

### पंडित सुरेश तळवलकर

गोरेगावनिवासी तालयोगी **पंडित सुरेश तळवलकर** यांच्या पुढाकाराने प्रबोधनने 'मुंबई महोत्सव' हा शास्त्रीय गाण्याचा कार्यक्रम सादर करून 13 एप्रिल 2001 रोजी पहिला मुंबई महोत्सव भरवून सुरुवात केली. दुसरा मुंबई महोत्सव दि. 25 व 26 जानेवारी 2002 रोजी साजरा होणार असल्याचे औचित्य साधून प्रा. केशव परांजपे यांनी तालयोगी पंडित सुरेश तळवलकर यांची **'यात्रा-स्वर-तालांची'** या कार्यक्रमांतर्गत प्रबोधन क्रीडाभवनाच्या हिरवळीवर एक मुलाखत घेतली. पंडित सुरेश तळवलकरांनी आपल्या नादमय भाषणात अनेक ताल तबल्यावर पेश केले व शास्त्रीय संगीतातील अनेक रागदारींची रहस्ये सहजतेने उलगडून दाखविली. संगीत क्षेत्रातील अनेक मान्यवरांनी उपस्थित राहून या सोहळ्यास एक वेगळीच नादमधुर रंगत आणली.

(5 जाने. 2002)

### डॉ. नीतू मांडके

**डॉ. नीतू मांडके** म्हणजे हिंदुहृदयसम्राट माननीय शिवसेनाप्रमुख श्री. बाळासाहेब ठाकरे यांच्या हृदयावर शस्त्रक्रिया करणारे प्रख्यात हृदयशस्त्रक्रियाविशारद तर आहेतच, पण ते चांगले प्रभावी वक्तेही आहेत याची प्रचीती आणून देणारे डॉ. नीतू मांडके यांचे सुश्राव्य व्याख्यान झाले. **'तुम्ही व तुमचे हृदय'** या विषयावरील त्यांचे अनुभवसिद्ध व्याख्यान ऐकून श्रोते खूष होऊन गेले. या कार्यक्रमास श्रोत्यांची उपस्थिती लक्षणीय होती.अँन्जिओग्राफी टाळण्यासाठी अँन्जिओग्राफीचे तंत्र व मंत्र डॉक्टरसाहेबांनी आपल्या व्याख्यानात सांगून श्रोत्यांना सुमारे तीन तास जागेवरच खिळवून ठेवले.हे व्याख्यान आयोजित करण्यासाठी डॉ. सीमा पंड्या यांचे विशेष साहाय्य झाले हे या ठिकाणी आवर्जून नमूद केले पाहिजे.

(23 मार्च 2002)

असूनही त्यांचे वागणे, बोलणे इतके साधे की त्यांच्याकडून विनम्रतेचे धडे गिरवावे.

दोन दिवसांचा संगीत सोहळा शेवटच्या टप्प्यावर असताना संतुर या वाद्याचे आद्य जादूगार पंडित शिवकुमार आणि तबलानवाज पंडित झाकिर हुसेन यांनी कलामंचाचा व श्रोत्यांच्या भावविश्वाचा ताबा घेतला. त्या दोघांनी अनोखे स्वरताल विश्वच निर्माण केले. त्या विश्वात विजांचा लखलखाट होता, रिमझिमणारा पाऊस होता, उगवतीचे सोनेरी किरण होते, चंद्राची शीतलता होती, तसेच तांडवातील रौद्र रूपही होते. त्या दोघांची जुगलबंदी थांबली तेव्हा दोन-चार मिनिटे श्रोत्यांना ती कळलीच नाही. मंत्रमुग्धतेतून सावचित व्हायला तेवढा वेळ लागतोच.

या दोन दिवस चाललेल्या **मुंबई महोत्सव**ची इतर अनेक वैशिष्ट्ये म्हणजे श्री. सुभाष देसाई आणि पंडित सुरेश तळवलकर यांच्या सर्वोत्तम नियोजनाची फळे होती. आसनव्यवस्था, आरक्षणव्यवस्था, कलामंचाची साधीच, पण कलापूर्ण बांधणी, कलाकारांचे आगमन-निर्गमन, त्यांचे सत्कार आणि त्यावेळची निवेदनव्यवस्था ह्या सगळ्यातील नेमकेपणा, मोजकेपणा, संक्षिप्तपणा हा प्रसंगाची शान वाढविणारा होता. पंडित सुरेशजी तर घरचे कार्य असावे या लगबगीत सदैव वावरत होते. सर्व स्वयंसेवक, मदतनीस, नियोजक आपापली कामे चोखपणे, शिस्त सांभाळून आणि हसऱ्या चेहऱ्याने करत होते. कोठेही गोंधळ, गडबड, तणातणी दिसत नव्हती. ध्वनिव्यवस्था आणि दूरदृश्यदर्शनव्यवस्था समाधानकारक होती. नियोजकांना आणि श्रोत्यांना सर्वोच्च न्यायालयाची **'कार्यक्रम समयमर्यादा'** विषयक नियमावली जाचक वाटली. ते नियम लोकाभिमुख नाहीत, जनहितकारक, सुखकारक नाहीत, अभिजात संगीतावर अन्याय करणारे आहेत, असेच सर्वांचे मत होते. असे मत असूनही कालमर्यादेचे नियम पाळण्यात आले.

मुंबई महोत्सवाचा हा द्वितीय वर्षाचा हा सुरेख सोहळा संपला तेव्हा श्रवणतृप्तता लाभूनही श्रोते आणि स्वयंसेवक, प्रबोधनचे प्रांगण आणि आसमंत एकमेकाला आणि मुंबई महोत्सवाला म्हणत होते **पुनरागमनायच.**

## हर्बल वर्ल्ड 2002

तिसाव्या वर्षात प्रवेश करण्याच्या निमित्ताने संस्थेच्या कार्यकारी मंडळाने पर्यावरणासंबंधी उपक्रम हाती घेण्याचे ठरवले व औषधी वनस्पतींचे प्रदर्शन भरविण्याचा विचार समोर आला. तेव्हा संस्थेच्या ज्येष्ठ सभासदांच्या सल्ल्याने वनस्पतीक्षेत्रातील तज्ज्ञ मंडळींची एक बैठक भरवण्यात आली. सुरुवातीच्या प्रयत्नात केवळ पंधरवड्यात **हर्बल वर्ल्ड 2002** या कल्पनेने जणू एका चळवळीचे स्वरूप धारण केले. एकदा ह्या संकल्पनेची आकारबद्ध चौकट ठरल्यानंतर ह्या क्षेत्रात आधीपासून कार्यरत असणाऱ्या संस्थांना भेटायचे ठरले. यांनी दिलेल्या उत्स्फूर्त प्रतिसादामुळे हर्बल वर्ल्ड 2002 ला प्रोत्साहन मिळाले.

**'हर्बल वर्ल्ड 2002'** च्या अंतर्गत महत्त्वाच्या उद्यानांना भेटी देणे हा या उपक्रमाचा पहिला टप्पा होता. महाविद्यालयांतील वनस्पतीशास्त्र व आयुर्वेदाच्या विद्यार्थ्यांसाठी हा उपक्रम होता.

# सनदी लेखापालांचा अहवाल

**जयंत आपटे**
सनदी लेखापाल
4/54, महेश निवास
तिसरा रस्ता, लोकमान्य टिळक नगर
गोरेगाव (प.), मुंबई - 400 062.

प्रबोधन गोरेगाव संस्थेचे 31मार्च 2002 रोजी पूर्ण झालेल्या वर्षाचे हिशेब आम्ही तपासले असून त्यासंबंधात पुढील माहिती देत आहोत.

- हिशेब नियमितपणे व संबंधित कायदा व नियम यानुसार ठेवलेले आहेत.
- आय आणि व्यय योग्य व बिनचुक पद्धतीने हिशेबात दाखविलेले आहेत.
- व्यवस्थापकाच्या ताब्यातील गंगाजळी व खर्चाच्या पावत्या हिशेब तपासणीच्या दिवशी हिशेब पत्रकाशी सुसंगत होत्या.
- सर्व पुस्तके, करार, हिशेब, खर्चाच्या पावत्या व अन्य कागदपत्रे आम्हाला दाखविण्यात आली.
- जंगम मालमत्तेची नोंद योग्यरित्या ठेवलेली होती, त्यातील बदल वेळोवेळी कळविले होते.
- आमच्या आवश्यकतेनुसार कार्यकारणी सदस्य उपस्थित राहिले व आवश्यक माहिती त्यांनी दिली.
- संस्थेचा कोणताही निधी किंवा मालमत्ता संस्थेच्या उद्दिष्ट किंवा ध्येयांव्यतिरिक्त अन्य कारणांसाठी वापरण्यात आलेला नाही.
- रू. 5,000/- पेक्षा अधिक किंमतीच्या दुरूस्ती किंवा बांधकामासाठी निविदा मागविलेल्या आहेत.
- धर्मादाय संस्थेची कोणतीही रक्कम कलम 35 च्या विरोधात गुंतविण्यात आलेली नाही.
- स्थावर मालमत्तेचा कोणताही विनियोग कलम 36 च्या विरोधात केलेला आम्हास आढळला नाही.

पुढे चालू..........

# परिशिष्ट क्र. 17 : 31/ 3/ 2002 अखेरील वर्षाच्या हिशेबाबत निवेदन

1. **हिशेबाबतचे धोरण**

   अ) आर्थिक तक्ते अनुभवीत किंमतीवर आधारित असतात. संस्था हिशेब व्यापारी पध्दतीने ठेवून जमाखर्चाची जुळवा-जुळवी करते.

   ब) स्थिर मालमत्तेची किंमत मालमत्ता जशी मिळाली किंवा बांधली त्याप्रमाणे दाखविलेली आहे.

   क) मालमत्तेवरील घसारा त्या मालमत्तेच्या अंदाजित आयुर्मानानुसार आकरला जातो.

   ड) ए.एस. 12, मध्ये दर्शविल्याप्रमाणे शासनाकडून व मुंबई महानगरपालिकेकडून भांडवली खर्चासाठी मिळालेली अनुदाने मालमत्तेच्या एकूण किंमतीतून कमी करून दाखविलेली आहेत.बाकीची अनुदाने जमाखर्चात उत्पन्न म्हणून दाखविलेली आहेत.

   इ) संस्थेने केलेल्या गुंतवणुका या दिर्घकालीन काळासाठी आहेत. या गुंतवणुका त्यांच्या मुळ किंमतीत दाखविलेल्या आहेत.

2. महानगरपालिकेला बांधकामापोटी देय असलेल्या 25% रक्कमेपैकी देणे बाकी असलेल्या तरतूद हिशेबात करण्यात आली नाही.

3. सन 1992 पासून महानगरपालिका करापोटी देय असलेल्या 4,55,120/- ची तरतूद करण्यात आलेली नाही. याबाबतीत महानगरपालिकेच्या संबंधीत खात्याशी विचानविनिमय सुरु आहे.

4. मागील वर्षाची आकडेवारी चालू वर्षाच्या आकडेवारीनुसार पुनःरगठीत व पुनःरचित करण्यात आलेली आहे.

परिशिष्ठ 1 ते 17 करिता स्वाक्षरी करून दिले<br>
**आपटे आणि कंपनी**<br>
सनदी लेखपाल

स्वाक्षरी /-<br>
**कार्याध्यक्ष / प्रमुख कार्यवाह / खजिनदार**<br>
प्रबोधन गोरेगाव

ज्ञान-कला-सेवा यांचा त्रिवेणी संगम !

प्रबोधन
गोरेगाव

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सहकार्यातून

**प्रबोधन क्रीडाभवन**

या सर्वांगसुंदर क्रीडासंकुलाची निर्मिती, ज्यामध्ये

क्रिकेट, जिमनॅस्टिक्स, ॲथलेटिक्स, टेबलटेनिस, योग, ॲरोबिक्स, कराटे व

नृत्य यांचे अष्टपैलू तज्ज्ञांकडून प्रशिक्षण उपलब्ध

तसेच सुसज्ज व्यायामशाळा, हेल्थक्लबमध्ये स्टीमबाथ, सौनाबाथ, जाकूझी इत्यादी

सुविधांची सोय आणि आता

मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या सहकार्यातून साकार झालेले

**प्रबोधन जॉगर्स पार्क**

व

टेबल प्रशिक्षणाची आणि सरावाची सुविधा असलेली **टेनिस ॲकॅडेमी** आणि सुंदर **जॉगिंग ट्रॅक.**

---

मराठी, इंग्रजी व हिंदी साहित्याने परिपूर्ण

**प्रबोधनकार ठाकरे वाचनालय**

आपणा सर्वांसाठी उत्तमोत्तम पुस्तके आणि बाळगोपाळांसाठी ज्ञान-मनोरंजनाचा मेवा

**प्रबोधन जॉगर्स पार्क** : सिद्धार्थ नगर, रस्ता क्र. 17, महात्मा गांधी मार्ग,

गोरेगाव (प.), मुंबई 400 062. दूरध्वनी : 878 23 24

**संपर्क : प्रबोधन क्रीडाभवन**, प्रबोधन क्रीडाभवन मार्ग, सिद्धार्थ नगर,

गोरेगाव (प.), मुंबई 400 104 दूरध्वनी : 873 48 69, 872 62 78

Contact us on : www.prabodhan.org